गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ५० वा ● शनिवार ०६ जुलै २०२४ ● पाने ४ ●किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 50 | Date : 06/07/2024 blow Saturday, Page 4 Price 4

# शेतकऱ्यांसाठी मोफत वीज योजना कायमचीच

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही



**✻ विरोधकांना झोपेतही गुजरात दिसते.**
**✻ बारामतीपासून काटेवाडीपर्यंत वारकरी व पालखीबरोबर जाणार.**
**✻ १७ शहरांमध्ये १० हजार पिंक रिक्षा, मागणीनुसार जिल्हा व तालुकास्तरापर्यंत विस्तार.**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : शेतकऱ्यांना साडेसात अश्र्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांना मोफत वीज योजना निवडणुकीपुरती नसून ती कायम सुरू राहील, अशी ग्वाही देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, आदिवासी, मागासवर्गीय, अल्पसंख्याक आदी सर्व समाजघटकांसाठी भरीव आर्थिक तरतुदी केल्याचे शुक्रवारी विधानसभेत स्पष्ट केले. तसेच बिहार व आंध्र प्रदेशच्या धर्तीवर केंद्राकडून राज्यालाही भरीव मदत मिळविण्याचे प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अर्थसंकल्पावरील चर्चेच्या उत्तरात अजित पवार यांनी, विरोधकांकडून अपप्रचार सुरू असल्याने निवडणुकीपर्यंत अर्थसंकल्पातील तरतुदींविषयीची माहिती लोकांच्या मनावर वारंवार बिंबविली जाईल. महाराष्ट्राची आर्थिक क्षमता प्रचंड असून महसुली व राजकोषीय तूट अधिक दिसत असली तरी ती वित्तीय निकषांच्या मर्यादितच असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांसाठीच्या विविध योजनांसाठी करोडो रुपयांच्या तरतुदी असून सरकार त्यांच्या पाठीशी असल्याने त्यांनी आत्महत्येचा विचार करू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

अल्पसंख्याकांसाठी मौलाना आझाद महामंडळासाठी ५०० कोटी रुपयांची शासकीय हमी देऊन आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. जनता एखादेवेळी फसेल, पण प्रत्येक वेळी अपप्रचार यशस्वी होणार नाही. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबाबतही विरोधकांकडून अपप्रचार सुरू आहे. महिलांनी कोणालाही दमडी देऊ नये, निकष पूर्ण करणाऱ्या महिलांना योजनेचा लाभ मिळेल. हा अजित पवार यांचा वादा आहे, असे पवार यांनी नमूद केले.

बिहार आणि आंध्र प्रदेशला केंद्राकडून विशेष दर्जा किंवा साहाय्य मिळणार असल्याचे ऐकवित आहे. केंद्र व राज्यात । **पान २ वर**

# टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाला अकरा कोटींचे पारितोषिक : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## विधानभवनात कर्णधार रोहित शर्मांसह सहकाऱ्यांचा विशेष सन्मान; वंदे मातरम्, भारत माता की जय.. घोषणांनी दणाणले मध्यवर्ती सभागृह

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : भारत हा क्रिकेटमध्ये विश्र्वगुरू आहे. हे आपल्या टी-२० विश्र्वचषक विजेत्या संघाने सिद्ध केले आहे. पराभवाच्या छायेतून विजय खेचून आणून, कर्णधार रोहित शर्मा आणि त्याच्या संघाने भारतीयांची छाती अभिमानाने फुलून यावी अशी कामगिरी केली आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विश्र्वविजेत्या भारतीय संघावर कौतुकाची उधळण केली. तसेच भारतीय संघासाठी महाराष्ट्र शासनाच्यावतीने अकरा कोटी रुपयांचे विशेष पारितोषिक जाहीर केले. मुंबई महानगर प्रदेशात भविष्यात भव्य आणि आधुनिक असे स्टेडियम उभारण्यास गती देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.





टी-२० विश्र्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार रोहित शर्मासह, त्याचे सहकारी सुर्यकूमार यादव, यशस्वी जयस्वाल, शिवम् दुबे, प्रशिक्षक पारस म्हाब्रे, संघ व्यवस्थापक अरूण कानडे यांचा आज विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात विशेष सत्कार करण्यात आला. खचाखच भरलेले हे मध्यवर्ती सभागृह आज क्रिकेटच्या जल्लोषाने दणाणून गेले. भारतीय राष्ट्रध्वज उंचावून सभागृहात भारत माता की जय आणि वंदे मातरम् च्या घोषणाही घुमल्या. 'हे जीवन म्हणजे क्रिकेट राजा, हुकला तो संपला या क्रिकेटमधीलच विक्रमादित्य लिटल मास्टर सुनील गावस्कर यांच्या आवाजातील गाण्याने आणि हिंदी चित्रपट चक दे इंडिया..!' च्या जल्लोषी सुरांनी सभागृह सुरुवातीपासूनच निनादून गेले. यातच टी-२० विश्र्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार रोहित शर्मा आणि सहकाऱ्यांचं आगमन होताच सभागृहातील घोषणा आणखी टिपेला पोहोचल्या.

या विशेष समारंभास विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार ॲड. आशिष शेलार, विधिमंडळाच्या दोन्ही । **पान २ वर**

## अपंग प्रशिक्षण केंद्रात २५ जुलै पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः दिव्यांग कल्याण आयुक्तालय, म.रा. पुणे मार्फत शासन मान्यता प्राप्त तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, देगलुर या संस्थेत म.रा. व्यवसाय शिक्षण व परिक्षा मडंळ मुंबई मार्फत मान्यताप्राप्त अभ्यासक्रमासाठी १८ ते ४० वयोगटातील अपंग, मुकबधीर, मतिमंद, मुला-मुलींना प्रवेश देण्यात येत आहे. सदरील प्रशिक्षण केंद्रात शिवण कर्तनकला, कॉम्प्युटर अकॉटींग व ऑफिस ऑटोमेशन, इलेक्ट्रीसियन व वेल्डर कम फॅब्रीकेटर इत्यादी अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात येत आहे. प्रवेशितांची निवासाची व जेवण्याची विनामुल्य सोय केलेली आहे. तरी इच्छुक अपंग, मुकबधीर व मतिमंद मुला-मुलींनी किंवा पालकांनी दि २५ जुलै २०२४ पर्यत प्राचार्य, तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, देगलुर जि. नांदेड येथे पत्रव्यवहार, करावे किंवा समक्ष भेटावे .असे आवाहन आश्रम शाळा अधिक्षक यांनी आवाहन केले आहे. शाळेचा पत्ता :- भायेगाव रोड, देगलूर ता. देगलूर जि. नांदेड मो. नं. - ९९६०९००३६९, ९४०३२०७१००, ७३७८६४११३६, ९४२०८४६८८७

## 'बीआरएस'च्या सहा आमदारांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**तेलंगणा/दैनिक यशसिध्दि न्यूजः** तेलंगणातील भारत राष्ट्र समितीच्या (बीआरएस) ६ विधानपरिषदेच्या आमदारांनी गुरुवारी रात्री काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे भारत राष्ट्र समितीचे प्रमुख आणि तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव यांना मोठा धक्का बसला आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या उपस्थितीत बीआरएसच्या या सहा आमदारांनी पक्षप्रवेश केला आहे. गेल्या



वर्षी तेलंगणामध्ये विधानसभेची निवडणूक झाली होती. या निवडणुकीत के.चंद्रशेखर राव यांच्या बीआरएसला मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागलं होतं. तेलंगणातील विधानसभेच्या निवडणुकीनंतर के.चंद्रशेखर राव यांना धक्यावर धक्के बसत आहेत. आता बीआरएसमधून काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या आमदारांमध्ये दंडे विठ्ठल, भानू प्रसाद राव, एमएस प्रभाकर, बसवाराजू सरैया, बोग्गारापू दयानाद आणि येगे मल्लेशम यांचा समावेश आहे. या आमदारांच्या काँग्रेसमधील पक्ष प्रवेशावेळी काँग्रेसच्या प्रभारी दीपा दास मुंशी यांच्यासह आदी नेते उपस्थित होते.। **पान २ वर**

## नीट पीजी २०२४ परीक्षेची नवी तारीख जाहीर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : नीट पीजी २०२४ परीक्षेची नवीन तारीख आता जाहीर करण्यात आली आहे. ही परीक्षा आता ११ ऑगस्ट रोजी दोन सत्रामध्ये घेतली जाणार आहे. याबाबतची अधिसूचना एनबीईएमएसकडून जारी करण्यात आली आहे. यासंदर्भातील एक परिपत्रकही जारी करण्यात आले आहे. नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्सने राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा नीट पीजी २०२४ या परीक्षेची तारीख जाहीर केली आहे. यानुसार आता ११ ऑगस्ट रोजी दोन सत्रात ही परीक्षा घेतली जाणार आहे. ११ ऑगस्ट रोजी देशभरातील विविध केंद्रांवर ही परीक्षा पार पडणार आहे. नीट पीजी २०२४ ची परीक्षा २३ जून रोजी होणार होती. मात्र, परीक्षेच्या एक दिवस आधी ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती. त्यानंतर आता या परीक्षेची नवी तारीख जाहीर करण्यात आली आहे. या परिक्षेसंदर्भातील अधिक माहिती उमेदवारांना अधिकृत वेबसाईट परींलेरीव.शर्वी.ळप वर पाहता येणार आहे. नीट पीजी २०२४ परीक्षेची नवीन तारीख जाहीर झाल्यानंतर । **पान २ वर**

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्ये मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचा सोलापूर जिल्ह्याचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे.शनिवार, दिनांक ०६ जुलै रोजी सकाळी ०७.१५ वा.शासकीय विश्रामगृह, सोलापूर येथे आगमन व राखीव. सकाळी ०८.५० वा.शासकीय विश्रामगृह येथून वाहनाने प्रयाण व अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला महाविद्यालय, राजेंद्र चौक, येथे सकाळी ०९.०० वा. विद्यार्थीनींचा कृतज्ञता मेळावा कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १०.१५ वा. वाहनाने जिल्हाधिकारी कार्यालय,कडे प्रयाण व स.१०.३० वा.जिल्हा नियोजन आराखड्याबाबत विभाग प्रमुखांची आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी १२.४० वा. वाहनाने सेटलमेंट ग्राऊंड, सेटलमेंट एरिया,कडे प्रयाण व ०१.०० वाजता महिलांचा कृतज्ञता मेळावा कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी २.१५ वा.शासकीय विश्रामगृह, सोलापूर येथे आगमन व राखीव व दुपारी ०३.०० वाजता पंढरपूर कडे प्रयाण. दुपारी ०४.३० कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय येथे आगमन व पंढरपूर आषाढी यात्रा-२०२४ नियोजनाबाबत आढावा बैठकीस उपस्थिती.

सायं. ०६.०० वा.पंढरपूर देवस्थान येथे आगमन व श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी राखीव. सायं. ०६.१५ वा. यात्री निवास, पंढरपूर येथील निवासाची पाहणी. सायं. ०६.३० वा.दर्शनवारी पत्राशेडची पाहणी व सायं.०६.४५ वा. पंढरपूर येथून वाहनाने पुणे कडे प्रयाण.

## पाणी पुरवठा व स्वच्छाता मंत्री गुलाबराव पाटील यांचा दौरा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील हे आज दि.०५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा पुढील प्रमाणे . पंढरपूर येथे सायं.०७.३० वा. आगमन व राखीव. सायं.०८.०० वा. पंढरपूर येथून शासकीय वाहनाने सोलापूर कडे प्रयाण. रात्री ०९.०० वा. शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव दि.०६ शनिवारी सकाळी ०८.०० वा. शासकीय विश्रामगृह सोलापूर येथून शासकीय वाहनाने धाराशिव कडे प्रयाण करतील.

# पालखी सोहळ्यात वारकरी भाविकांना आवश्यक सुविधा देण्याससोबतच स्वच्छतेला प्राधान्य द्यावे :विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार

## विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केली पालखी मार्ग,तळांची पाहणी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी शुद्ध एकादशी सोहळा १७ जुलै २०२४ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी श्री ज्ञानेश्र्वर महाराज, संत तुकाराम पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. या कालावधीत वारकरी भाविकांना पालखी मार्ग, पालखीतळ, विसावा आणि रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पाणी, आरोग्य, सुरक्षा, स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे अशा सूचना विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिल्या.

यावेळी आमदार रमेश बोरनारे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह, नगर विकास विभागाचे उपसचिव तथा समन्वय अधिकारी अनिरुध्द जेवळीकर सार्वजनिक बांधकामचे अधिक्षक अभियंता संजय माळी, प्रांताधिकारी सचिन इथापे, अमित माळी, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मुख्यमंत्री सचिवालयाचे विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे, तहसीलदार



सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, अक्षय महाराज भोसले राणा महाराज वासकर, रामकृष्ण वीर महाराज तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्त पुलकुंडवार म्हणाले, पालखी मार्गावरुन पालखी तळांकडे जाणाऱ्या रस्त्यांची वारीपूर्वी दुरूस्ती करावी. पालखी तळावर आवश्यक ठिकाणी मुरूमीकरण, स्वच्छता, मुबलक पाणी पुरवठा ,आरोग्य सुविधा देण्यात याव्यात. भंडीशेगांव पालखी तळावर पाणी साचणार याची दक्षता घ्यावी. तसेच त्या ठिकाणी आवश्यक यंत्रणा उपलब्ध ठेवावी. पालखी तळांवर कायमस्वरुपी सुविधा देण्याबाबत पालखीसोहळा प्रमुखांशी चर्चा करुन नियोजन करावे. वारी कालावधीत वैद्यकीय सुविधेबरोबर तज्ञ डॉक्टरांची नेमणूक करावी. श्री संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्र्वर महाराज यांच्या पालखी सोहळा स्वागत विसावा । **पान २ वर**

## संपादकीय

### अस्वस्थता बोलून दाखवली होती..

विधानसभा निवडणुकीत त्याची पुनरावृत्ती होऊ नये याची काळजी भाजपचे नेते घेताना दिसत आहेत. ओबीसी नेत्या पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, परिणय फुके, अमित गोरखे आणि योगेश टिळेकर यांना विधान परिषदेची उमेदवारी देऊन भाजपने असंतुष्टांसह ओबीसी नेते दुखावणार नाहीत, याची काळजी घेतल्याचे दिसून येत आहे. पंकजा यांना पुन्हा राज्यातील राजकारणात प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्याचबरोबर धनंजय मुंडेंचा विधानसभेचा मार्ग सुकर झाला आहे. लोकसभा निवडणुकीत पंकजा यांचा ज्येष्ठ नेते शरद पवार गटाचे बजरंग सोनावणे यांनी पराभव केला होता. २०१९ च्या विधानसभेतील पराभवानंतर पंकजा यांना बसलेला हा दुसरा मोठा धक्का होता. पंकजा यांचे राजकीय पुनर्वसन करण्याची मागणी त्यांचे समर्थक करत होते. लोकसभा निवडणुकीत मराठा–ओबीसी वादाचा फटका भाजपला बसला होता. त्यामुळे मुंडेंना नाराज करणे विधानसभा निवडणुकीसाठी धोकादायक ठरण्याची शक्यता होती. दुसरीकडे, राष्ट्रवादी सोबत असल्याने धनंजय मुंडे यांना परळी विधानसभा मतदारसंघ सोडणे भाजपला भाग आहे. यातून मार्ग काढत भाजप नेत्यांनी पंकजा मुंडेंना थेट विधान परिषदेत पाठवण्याचा निर्णय घेतल्याचे दिसत आहे. पंकजा यांना मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने पडली होती. जनतेच्या मनातील मुख्यमंत्री असे सांगत त्यांनी उघडपणे मुख्यमंत्री होण्याची इच्छाही प्रकट केली होती. हीच इच्छाशक्ती त्यांना घातक ठरली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडेंच्या पदरी अपयश आले. लोकसभा निवडणुकीत भाजपला महाराष्ट्रात बसलेला धक्का पंकजा मुंडेंच्या राजकीय पुनर्वसनाचा राजमार्ग ठरला आहे. पंकजा यांना विधान परिषदेत पाठवण्याचा निर्णय भाजपकडून घेण्यात आला आहे. भाजपकडून आता जपून पावले उचलण्यात येत आहेत. विधान परिषदेच्या बारापैकी पाच जागांवर भाजपचे उमेदवार निवडून येणार आहेत. त्यामुळे भाजपने विधान परिषदेसाठी पंकजा यांची उमेदवारी अखेर जाहीर केली आहे. अलीकडे सांगली येथे झालेल्या महायुतीच्या मेळाव्यात निवडणूक आली की भाजपला आमची आठवण येते, अशा शब्दात खोत यांनी आपली अस्वस्थता बोलून दाखवली होती

# एसएनडीटी महिला विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रदर्शन केंद्र निर्माण करावे : राज्यपाल

## एसएनडीटी महिला विद्यापीठाचा १०९ वा स्थापना दिवस संपन्न

मुंबई : मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर आहे. देश–विदेशातील लोक या शहराला भेट देत असतात. महर्षी कर्वे यांनी महिलांसाठी स्थापन केलेल्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाने आपली आंतरराष्ट्रीयस्तरावर 'दृश्यता' वाढविण्यासाठी एक प्रदर्शन केंद्र तसेच विद्यार्थ्यांसाठी 'आऊटरीच सेंटर' निर्माण करावे, अशी सूचना राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी आज येथे केली. अशा प्रकारच्या प्रदर्शन केंद्रामुळे मुंबईला येणाऱ्या महत्त्वाच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अतिथींना विद्यापीठाची महती व संशोधन, गृह विज्ञान, क्रीडा व इतर क्षेत्रातील उपलब्धी समजण्यास मदत होईल, असे राज्यपालांनी सांगितले.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचा १०९ वा स्थापना दिवस राज्यपाल श्री. बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज विद्यापीठाच्या महर्षी कर्वे शैक्षणिक परिसर, मुंबई येथे झाला. त्यावेळी ते बोलत होते. भारतरत्न महर्षी कर्वे यांनी सन १९१६ मध्ये याच दिवशी विद्यापीठाची स्थापना केली होती.यावेळी विषमुक्त शेती व देशी बियाणांच्या जतनासाठी कार्य करणाऱ्या पद्मश्री राहीबाई पोपेरे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव, प्र.कुलगुरु डॉ. रुबी ओझा, कुलसचिव विकास नांदवडेकर, माजी कुलगुरु रूपा शहा व चंद्रा कृष्णमूर्ती, सुधीर ठाकरसी, अधिष्ठाता, अध्यापक तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

महर्षी कर्वे यांनी महिला सक्षमीकरणाच्या कार्याला सुरुवात केली त्यावेळी देश पारतंत्र्यात होता. भारतीय समाज अंधश्रद्धा आणि रूढी परंपरांमध्ये गुरफटला होता. महिला साक्षरतेचे प्रमाण कमी होते. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी कर्वे आणि इतर दृष्ट्या व्यक्तींनी केलेल्या कार्यामुळे देशात महिला शिक्षण तसेच सक्षमीकरणाचे कार्य शक्य झाले, असे सांगताना महिला विद्यापीठाने श्रेष्ठ १०० विद्यापीठांमध्ये स्थान मिळवण्याचे उद्दिष्ट ठेऊन काम




करावे, असे आवाहन राज्यपालांनी केले.

स्थानिक स्वराज्य संस्था, व्यवसाय, कॉर्पोरेट तसेच विद्यापीठांमध्ये महिला नेतृत्वस्थानी आहेत. नागरी सेवा, पोलीस सेवा आणि सशस्त्र दलांमध्ये देखील महिलांची टक्केवारी सातत्याने वाढत आहे. भारताच्या स्टार्टअप क्रांतीमध्ये देखील महिला उद्योजक आघाडीवर आहेत. परंतु विकसित राष्ट्रांच्या तुलनेत देशातील कार्यबलामध्ये महिलांचा सहभाग कमी आहे. महिलांना कौशल्ये प्रदान करून आणि त्यांची सध्याची कौशल्ये उन्नत करून श्रमशक्तीमध्ये त्यांचा सहभाग वाढवावा, असे राज्यपालांनी सांगितले.

उच्च शिक्षणात सकल नोंदणीचे गुणोत्तर ५० इतके साध्य करण्याचे दृष्टीने विद्यापीठाने शाळांमध्ये जाऊन भावी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे तसेच त्यासाठी समाज माध्यमांचा उपयोग करावा, अशी सूचना राज्यपालांनी केली.

अवघ्या चार विद्यार्थिनींपासून सुरू झालेले एसएनडीटी महिला विद्यापीठ आज ३९ विभाग, १३ संस्था आणि ३०७ महाविद्यालये यांच्या माध्यमातून ६९००० विद्यार्थिनींना उच्च शिक्षण देत आहे, ही अभिमानाची बाब असल्याचे राज्यपाल श्री. बैस यांनी सांगितले.प्रगतीशील शेतकरी राहीबाई पोपेरे यांनी सेंद्रिय शेतीला चालना देण्यासोबतच शेकडो देशी बियाणांच्या संवर्धनासाठी अद्भुत काम केले असल्यामुळे राहीबाई पोपेरे या स्वतःच कृषी क्षेत्रातील 'विद्यापीठ' झाल्या आहेत असे सांगून विद्यार्थिनींनी राहीबाईंच्या जीवनातून प्रेरणा घेऊन स्वतःचा स्वतंत्र मार्ग निर्माण करावा, असे आवाहन राज्यपालांनी केले.

प्रत्येकाचे ताट विषमुक्त व्हावे : राहीबाई पोपेरे यांच्या संदेशाने विद्यार्थीनी भारावल्या

आपण शाळेची पायरी चढलो नाही, परंतु निसर्गाची शाळा शिकलो. सेंद्रिय शेती करून व देशी वाण घराघरातून पोहोचवणे ही काळाची गरज आहे. यासाठी आपण सीड बँक तयार केली. बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण केले. माती वाचवली तर पिढ्या वाचतील असे सांगून विद्यार्थ्यांनी पुस्तकाच्या ज्ञानाबरोबरच निसर्गाचे देखील ज्ञान घ्यावे, असे राहीबाई पोपेरे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

सेंद्रिय शेतीला चालना देऊन विषमुक्त अन्न तयार झाले पाहिजे. विद्यापीठांनी देखील हे काम हाती घेतले पाहिजे असे त्यांनी सांगितले. प्रत्येक गावात किमान एक राहीबाई असावी व प्रत्येकाचे ताट विषमुक्त झाले पाहिजे असे त्यांनी सांगितले. राहीबाई पोपेरे यांच्या संवादाने विद्यार्थीनी भारावल्या.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते विद्यापीठातील सर्वोत्तम महाविद्यालय, उत्कृष्ट शिक्षक व उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी यांना भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच निवडक विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. सुरुवातीला राज्यपालांनी भारतरत्न महर्षी कर्वे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

पान १ वरुन

### शेतकऱ्यांसाठी मोफत ..

एकाच विचारांचे सरकार असल्याने राज्यालाही केंद्राकडून मदत मिळावी, असे प्रयत्न केले जातील, असे पवार यांनी सांगितले. राज्याचे कर्ज सात लाख ८२ हजार कोटी रुपयांवर गेल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात येत आहे. ही वाढ १०.६७ टक्के आहे. मी कर्जाचे समर्थन करीत नाही. पण वित्तीय निकषांनुसार ते २५ टक्क्यांपेक्षा कमी आवश्यक असून या आर्थिक वर्षात ते १८.३५ टक्के असेल. राज्य उत्पन्नाच्या ते २.३२ टक्के असून केंद्राच्या तीन टक्के कमाल मर्यादेच्या आतच आहे.

मुंबई–गोवा रस्ता अनेक वर्षे रखडला असल्याची कबुली देत ' बॉम्बे टू गोवा ' चित्रपटासारखा एखादा चित्रपट किंवा पुस्तक लिहावे लागेल, अशी परिस्थिती असल्याचा टोला पवार यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना उद्देशून लगावला. कित्येकांनी आम्ही आमदार–खासदार झाल्यावर हा रस्ता पुरा करू, असे जनतेला निवडणुकीत सांगितले व निवडून आले. पण हा रस्ता काही झाला नाही. पण केंद्रीय रस्तेवाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी हे काम लवकर पूर्ण करण्याची ग्वाही दिली आहे, याकडे पवार यांनी लक्ष वेधले.

### पालखी सोहळ्यात वारकरी भाविकांना

मंदिर येथे श्री नामदेव महाराजांचा पालखी सोहळ्याकडून करण्यात येते. या ठिकाणी स्वागतासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. ६५ एकर येथे प्रशासनाकडून दिड्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात येते. ती जागा अपुरी पडत असेल तर खाजगी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. तसेच पालखी सोहळा आणि सर्व भाविकांचा प्रवास सुखकर, सुरक्षित होईल यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून, कुठेही काही गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. यंदाची आषाढी यात्रा निर्मल वारी व्हावी यासाठी सर्व व्यवस्था चोख असेल याअनुषंगाने काम सुरु असल्याचे विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले, पालखी मार्ग व तळांवर सुविधा बाबत पालखी सोहळा प्रमुखांनी सुचविलेल्या कामांना प्राधान्य देवून ती कामे पुर्ण करण्यात येत आहेत. पालखी सोहळे जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर सर्व भाविकांना , पालखी मार्ग व तळांवर आवश्यक सुविधा प्रशासनकडून उपलब्ध केल्या जातील असे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच जिल्हा प्रशासनाकडून पालखी मार्गावर व तळांवर प्रशासकडून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली.मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी पालखी मार्ग व तळांवर जिल्हापरिषदेमार्फत आरोग्य, पिण्याचे पाणी, स्नानगृह, हिरकणी कक्ष, विश्रांती कक्ष महिला भाविकांसाठी देण्यात येणाऱ्या सुविधेबाबत माहिती दिली. विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी नातेपुते, माळशिरस, वेळापूर, पिराची कुरोली, भंडीशेगांव, वाखरी येथील पालखी तळांची तसेच पत्राशेड, दर्शनरांग, चंद्रभागा नदी पात्र या ठिकाणची पाहणी करुन आवश्यक सूचना दिल्या.

यावेळी श्री संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्र्वर महाराज यांच्या पालखी सोहळा स्वागत विसावा मंदिर येथे श्री नामदेव महाराजांचा पालखी सोहळ्याकडून करण्यात येते.या स्वागत सोहळयाला जागा उपलब्ध करून द्यावी. पालखीसोहळ्या बरोबर येणाऱ्या दिंड्यांच्या ट्रकची उंची जास्त असल्याने रेल्वे रुळाच्या ठिकाणी लावण्यात आलेल्या ओव्हर हेड करिअर मुळे वाहने शहरात येणार नाहीत. पंढरपूर शहरात अनेक दिंडी सोहळ्यांचे मठ असल्याने त्यांना आत ट्रक आणण्यास अडचणी निर्माण होतात या बाबत नियोजन करावे अशी मागणी राणा महाराज वासकर यांनी यावेळी केली.

### टी–२० विश्वचषक विजेत्या

सभागृहातील सदस्य, क्रीडाप्रेमी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, 'या स्पर्धेत भारतीय संघाने पाकिस्तानच्या संघाला हरवलं तेव्हाच आपण अर्धा विश्र्वचषक जिंकला. सुर्यकुमार यादव च्या अजरामर झेलमुळे आपण विश्र्वचषक जिंकला आणि देशभरात गेले आठवडाभर जल्लोष सुरु झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील भारतीय संघाचं अभिनंदन केले आहे. या विजयामुळे देशवासियांचा, देशाचा गौरव झाला आहे, या भावनाने भारतीय संघाचे स्वागत करत आहेत. याचसाठी काल विजेत्या संघाच्या स्वागतासाठी मुंबईत अरबी समुद्राच्या शेजारीच जनसागर उसळला होता. आपल्या या संघाने भारतच क्रिकेटमध्ये विश्र्वगुरू आहे हे सिद्ध केले आहे. मुंबई ही क्रिकेटची पंढरी आहे. आपले वारकरी विठ्ठलच्या दर्शनासाठी वारीमध्ये सहभागी झाले आहेत. तर काल क्रिकेटप्रेमी वारकरी याच भावनेने मुंबईकडे आले आहोते. मुंबईत दिवाळी–दसराच साजरा झाला. भारतीय संघात मुंबईकर चार खेळाडू आहेत. कर्णधार रोहीत शर्मासह, सूर्यकुमार हे विजयाचे शिल्पकार आहेत याचा सर्वांनाच अभिमान आहे. विशेष म्हणजे एकही सामना न हारता, या संघांने विश्र्वचषक जिंकला आहे, ही ऐतिहासिक कामगिरी असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

भारतीय संघातील मुंबईतील अनेक दिग्गज आणि महान क्रिकेटपटूंचा समावेश असल्याचा उल्लेख करून मुख्यमंत्री म्हणाले की, १९८३ चा विश्र्वचषक आपण कपिल देव यांनी घेतलेल्या त्या एका झेलमुळे जिंकलो होतो. कपिल देव यांचा तो झेल आणि सुर्यकुमार यादव यांचा या स्पर्धेतील झेल हा भारतीयांसाठी अजरामर क्षण ठरला आहे. हे विश्र्वविजेतेपद प्रत्येक भारतीयांच्या आकांक्षेचे प्रतिक आहे. या मुंबईकर खेळाडूंनी आपल्या नावाप्रमाणेच भारताची विजयी पताका जगात फडकवली आहे. त्यांनी यापुढेही भारतीयांना असाच आनंदोत्सव साजरा करण्याची संधी मिळवून द्यावी, यासाठी मुख्यमंत्र्यांनी भारतीय संघाला शुभेच्छा दिल्या.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, भारतीय संघाने आपल्या सर्वांसाठी आनंदाचा क्षण आणला आहे. एका अपराजित संघाने विश्र्वचषक जिंकला आहे. रोहीत शर्मांनी अद्वितीय कामगिरी करत, भारतीय क्रिकेटच्या दिग्गजांच्या मांदियाळीत स्थान पटकावले आहे. रोहित यांनी कपिल देव, महेंद्रसिंह धोनी यांच्यानंतर आपला नावलौकीक केला आहे. कर्णधार म्हणून रोहित यांनी संघातील सहकाऱ्यांचा जिंकलेला विश्र्वास हा महत्त्वाचा आहे. त्यांची नेतृत्व शैली ही भारतीय संघाच्या कर्णधाराची परंपरा राखणारी आहे. मुंबईकर हे सर्व खेळाडू महाराष्ट्राचा अभिमान असल्याचेही सांगून आता मुंबई क्रिकेट असोसिएशनने मुंबईत १ लाखापेक्षा जास्त क्षमतेचे आधुनिक स्टेडियम बांधण्याची सूचना त्यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनला केली. भारतीय संघाच्या स्वागतासाठी मुंबईकरांनी केलेली गर्दी अभूतपूर्व होती. मात्र मुंबईकरांनी शिस्त मोडली नाही, त्यामुळे त्यांनी मुंबईकराचे अभिनंदन केले.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, की विधानभवनात असा दिमाखदार समारंभ होतो आहे, याचे मोठे समाधान आहे. चमत्कार घडेल असे वाटत होते आणि चमत्कार घडला. आपला क्रीडा रसिक आगळावेगळा आहे. मरिन ड्राईव्हला अभूतपूर्व गर्दी झाली होती. भारतीय लोक क्रिकेटवर प्रेम करतात, असे प्रेम जगात कुठेही दिसत नाही. यात अमेरिकासारखा संघही आता पुढे आला आहे.

सूर्यकुमार यांचा झेल हा अप्रतिमच होता. यापुढे रोहित टी–२० खेळणार नाही.पण यापुढे ज्या–ज्यावेळी आपण टी–२० पाहू, त्यावेळी रोहितची आठवण आल्याशिवाय राहणार नाही. विधानसभेचे अध्यक्ष ॲड. नार्वेकर म्हणाले की, भारतीय क्रिकेट संघाने प्रत्येकाला अभिमानाचा क्षण मिळवून दिला. क्रिकेटमुळे विधिमंडळ कामकाज करतांनाही मदत होते, असे सांगत त्यांनी विधिमंडळातर्फे खेळाडूंना शुभेच्छा देऊन आगामी काळात गौरवशाली क्षण मिळवून देण्याबद्दल त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, विधानभवनात प्रथमच अशाप्रकारचा कार्यक्रम होत आहे. हा सोहळा महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने होणारा सत्कार होता. खेळाडूंच्या विजयासाठी प्रत्येक नागरिकाने शुभेच्छा व्यक्त केल्या होत्या. या अभूतपूर्व विजयानंतर क्रिकेटसह सर्व क्षेत्रातील प्रगतीसाठी एकत्र यावे, असेही आवाहन उपसभापती डॉ.गोऱ्हे यांनी केले.यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते कर्णधार रोहित शर्मा यांच्यासह खेळाडूंचे वैशिष्ट्यपूर्ण ट्रॉफी, विधानमंडळाचे स्मृतीचिन्ह, छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनाधिष्ठित मूर्ती, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कर्णधार रोहित शर्मा, सुर्यकुमार यादव, यशस्वी जयस्वाल, शिवम दुबे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रीयन असल्याचा आम्हाला अभिमान आहे. या सत्कार सोहळ्याने आनंदीत झालो आहोत. काल आणि आज झालेले स्वागत आम्ही कधीच विसरू शकणार नाहीत. मुंबई पोलिसांनी केलेले नियोजन अप्रतिम होते. विश्र्वकरंडक जिंकणे हे आमचे स्वप्न होते. सर्व खेळाडूंनी बजावलेल्या सांघिक प्रयत्नांमुळे हा करंडक जिंकता आला. या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल त्यांनी संयोजकांचे आभार मानले. विधानभवनाचे जनसंपर्क अधिकारी नीलेश मदाने यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.


### नीट पीजी २०२४ परीक्षेची

आता परीक्षेच्या नवीन तारखेसह नीट पीजी २०२४ परीक्षेसाठी प्रवेशपत्र पुन्हा जारी करण्याची शक्यता आहे. या परीक्षेच्या आधी एक आठवडा हे प्रवेशपत्र डाउनलोड करण्यासाठी ऑनलाईन उपलब्ध केले जाणार आहेत. यासंदर्भात अधिकृत वेबसाईटवरून प्रवेशपत्र डाउनलोड करता येणार आहेत. दरम्यान, नीट पीजी २०२४ ही परीक्षा यापूर्वी २३ जून रोजी होणार होती. मात्र, पेपर लीक आणि परीक्षेत गोंधळामुळे खबरदारीचा उपाय म्हणून ही परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यासंदर्भातील निर्णय केंद्र सरकारकडून घेण्यात आला होता. नीट–पीजी २०२४ परीक्षेमधील गोंधळामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले होते. परीक्षेतील गोंधळामुळे देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली होती. या देशव्यापी परीक्षेतील गोंधळानंतर विरोधकांनी सरकारला धारेवर धरले होते. मात्र, आता ही परीक्षा ११ ऑगस्ट रोजी दोन सत्रामध्ये घेतली जाणार आहे.

### 'बीआरएस'च्या सहा

दरम्यान, तेलंगणा विधानपरिषदेत बीआरएसचे २५ सदस्य आहेत. मात्र, बीआरएसच्या विधानपरिषदेतील ६ आमदारांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे काँग्रेसची ताकद आणखी वाढली आहे. विधानपरिषदेतील काँग्रेसच्या आमदारांची संख्या चारवरून आता दहावर पोहचली आहे. माजी मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव यांचे विश्र्वासू समजले जाणारे केशव राव यांनीही काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

केशव राव हे राज्यसभेवर खासदार होते. मात्र, काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर केशव राव यांनी खासदारकीचा राजीनामा दिला असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी हे दोन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर होते. दिल्ली दौऱ्यावरून तेलंगणात दाखल झाल्यानंतर गुरुवारी रात्री बीआरएसच्या सहा आमदारांनी मध्यरात्रीच काँग्रेसमध्ये प्रवेश केला. के.चंद्रशेखर राव हे दोन पंचवार्षिक सत्तेत राहिले. मात्र, गेल्या वर्षी झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत बीआरएसचा दारुण पराभव झाला. बीआरएसला ११९ पैकी फक्त ३९ जागा मिळाल्या होत्या. त्यामधूनही निवडणुकीनंतर काही आमदारांनी बीआरएससोडून दुसऱ्या पक्षात प्रवेश केला होता. यानंतर आता विधानपरिषदेतील सहा आमदारांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे बीआरएस पक्षासाठी हा मोठा धक्का असल्याचं बोललं जात आहे.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# मागण्या मान्य न झाल्यास एकादशी दिवशी धनगर बांधव शेळ्या मेंढ्या सहित विठ्ठल मंदिराला प्रदक्षिणा घालणार : माऊली हळणवर



**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

धनगर समाज व एन्टी प्रवर्गातील सर्व तरुणांना अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या धर्तीवर बिनव्याजी कर्ज मिळावे यांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी तशा प्रकारचे आदेश सर्व बँकांना द्यावेत पंढरपूर येथे अहिल्या भवन साठी जागा उपलब्ध करून पाच कोटी निधी द्यावा या प्रमुख मागण्यासाठी विधानभवनातील उपमुख्यमंत्री यांचे कार्यालयात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन दिले यावेळी माऊली भाऊ हळणवर, नवनाथ पडळकर अमोल बापू कारंडे यतीराज होनमाने यांच्यासह धनगर समाजाचे शिष्टमंडळ उपस्थित होते. वरील मागण्या मान्य न झाल्यास पंढरपूर येथे आषाढी एकादशीला पहाटे दोन वाजता विठ्ठल मंदिराला शेळ्या मेंढ्या सहित धनगर समाज बांधव प्रदक्षणा घालणार आहेत होणाऱ्या सर्व परिणामाची जबाबदारी सरकार वरती राहील अशा प्रकारचे निवेदन दिले यावेळी बोलताना भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माऊली हळणवर म्हणाले की आम्ही सर्वजण भारतीय जनता पार्टी बरोबर सरकारमध्ये सामील असून सुद्धा हे सरकार धनगर समाजाला दुजाभावाची वागणूक देत असल्याचे दिसून येते आज आम्ही आमचे नेते देवेंद्रजी फडणवीस यांना सांगितले की आमच्या समाजातील तरुण सरकारवर प्रचंड नाराज असून आम्ही काम करत असताना आम्हाला खूप त्रास होत आहे सरकार धनगर समाजाला मदत करत नसल्याचे भावना आमच्या समाजाची निर्माण झाली आहे त्यामुळे आषाढी एकादशीला होणाऱ्या आंदोलनात आम्ही जरी भाजपाचे कार्यकर्ते असलो तरी समाजाची भावना लक्षात घेऊन आम्हाला या आंदोलनात सरकार विरोधात उतरावे लागेल महाराष्ट्र मध्ये धनगर समाजातील तरुणांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे इतर समाजातील तरुणांना अनेक उद्योग करण्यासाठी चार दिवसात कर्ज मंजूर केले जाते त्याचे व्याज सरकार भरते परंतु आमच्या समाजाला आहे अहिल्यादेवी आर्थिक विकास महामंडळाकडून फक्त शेळ्या मेंढ्या ची एक दोन प्रकरणे दिली जातात त्यामुळे समाजातील तरुणांची बेरोजगारांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे सरकारने या मागण्याची गंभीर दखल घ्यावी अशा प्रकारचे निवेदन आज आम्ही उपमुख्यमंत्री यांना दिले आहे त्यांनीही सकारात्मक भूमिका घेत लवकरच यावर तोडगा काढू असे आश्र्वासन दिले आहे

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेशाध्यक्ष सुनीलजी तटकरे यांची आनंद चंदनशिवे यांनी घेतली भेट

## आगामी विधानसभा अनुषंगाने आंबेडकरी समुहामध्ये पक्ष संघटन मजबुत करणे व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढविण्या संदर्भात झाली विस्तृत चर्चा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई: राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ची मुंबईतील महिला विकास मंडळ कुलाबा सभागृह या ठिकाणी आगामी विधानसभा निवडणुक, पक्ष संघटना मजबुतीकरण याबाबत युवक संघटना, विद्यार्थी संघटना ,महिला संघटना यांच्यासह सर्व सेल व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांचा मार्गदर्शन व आढावा बैठक मेळावा आयोजित करण्यात आला होता. सदर आढावा बैठक प्रदेशाध्यक्ष मा. सुनील तटकरे , महिला प्रदेशाध्यक्ष रूपालीताई चाकणकर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस शिवाजीराव गर्जे ,प्रदेश सरचिटणीस लतीफजी तांबोळी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री सुनीलजी तटकरे व महिला प्रदेशाध्यक्ष रुपलीताई चाकणकर यांचा शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला.




यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेशाध्यक्ष मा. सुनीलजी तटकरे यांची मा. गटनेता आनंद चंदनशिवे यांनी आगामी विधानसभा अनुषंगाने आंबेडकरी समुहामध्ये पक्ष संघटन मजबुत करणे व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढविण्या संदर्भात विस्तृत चर्चा करण्यात आली.या मार्गदर्शन व आढावा बैठक प्रसंगी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शहर व जिल्हा पदाधिकारी कार्यकर्ते यांना मार्गदर्शन केले व येणाऱ्या काळामध्ये पक्ष संघटनेपासून दूर गेलेले सर्व पदाधिकारी कार्यकर्ते समाज बांधव यांना एकत्रित करून नव्या जोशाने विधानसभा निवडणुकीस सामोरे जाण्याबद्दल सूचना केल्या तसेच विविध समस्या अडचणी याचबरोबर विविध राजकीय संघटन व विधानसभा निवडणूक अनुषंगाने प्रमुख मान्यवरानी सविस्तर असे मार्गदर्शन केले. यावेळी महाराष्ट्र राज्य जनरल सेक्रेटरी श्री शिवाजीराव गर्जे,सोलापूर प्रदेश सरचिटणीस श्री लतिफ तांबोळी मा.गटनेते आनंद चंदनशिवे, प्रदेश मा.नगरसेवक गणेश पुजारी , राष्ट्रवादी युवक प्रदेश सचिव सनी देवकते तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विविध कृषी पुरस्कार सन २०२३ साठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सातारा/प्रतिनिधीः कृषी विभागामार्फत राज्यात कृषी आणि संलग्न क्षेत्र तसेच फलोत्पादन क्षेत्रामध्ये उल्लेखनिय कार्य करणा-या, कृषी उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरिता योगदान देणा-या शेतक-यांचा तसेच कृषी विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी करणा-या राज्यातील शेतकरी महिला, शेतकरी संस्था/गट, कृषी पत्रकार यांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न, वसंतराव नाईक कृषीभूषण, जिजामाता कृषीभूषण, सेंद्रीय शेती कृषीभूषण, उद्यानपंडीत, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, युवा शेतकरी पुरस्कार व कृषी विभागामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात येते. कृषी विभागामार्फत सन २०२३ या वर्षामध्ये कृषी व संलग्न क्षेत्रात ल्लेखनिय कार्य केलेल्या व्यक्ती / गट/संस्था यांचे उपरोक्तप्रमाणे विविध कृषी पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. पुरस्काराचे स्वरुप पुढीलप्रमाणे- डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, पुरस्काराची रक्कम रु. ३ लाख, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार- रु. २ लाख, जिजामाता कृषिभूषण पुरस्कार- रु. २ लाख, कृषिभूषण, सेंद्रिय शेती पुरस्कार- रु. २ लाख, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार- रु. १ लाख २० हजार, युवा शेतकरी पुरस्कार- रु. १ लाख २० हजार, उद्यान पंडित पुरस्कार- रु. १ लाख, वसंतराव नाईक शेतिनिष्ठ शेतकरी पुरस्कार (सर्व साधारण व अदिवासी



ट) रु. ४४ हजार.

तरी जास्तीत जास्त शेतकरी / गट/संस्था/व्यक्ती यांनी विविध कृषी पुरस्कार प्रस्ताव आपल्या नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, भाग्यश्री फरांदे यांनी आवाहन केले आहे. विविध कृषी पुरस्कार प्रस्ताव तयार करणेकामी अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# पंचायत समिती अक्कलकोट यांच्या वतीने आकांक्षित तालुका योजनेचे उद्घाटन

## ■ आरोग्य शिबिरसह महिला जागृतीसाठी पथनाट्याचे सादरीकरण ■




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः पंचायत समिती अक्कलकोट यांच्या वतीने आकांक्षित तालुका अक्कलकोट येथे नीती आयोगाच्या माध्यमातून मा.श्री कुमार आशीर्वाद जिल्हाधिकारी सोलापूर व मा.मनिषा आव्हाळे मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली चार जुलै २०२४ ते ३०सप्टेंबर २०२४ या कालावधीत सुरू झालेल्या संपूर्णता अभियान उद्घाटन कार्यक्रम मल्लिकार्जुन मंगल कार्यालय येथे सातशे ते आठशे लोकांच्या उपस्थितीत आणि नीती आयोगाच्या प्रतिनिधी श्रीमती सायली माणकिकर यांच्या उपस्थितीत पार पडला.

निती आयोगामार्फत सुरू असणाऱ्या आकांक्षीत तालुका या योजनेत एकूण ४० इंडिकेटर वरती काम चालू आहे. या ४० इंडिकेटर पैकी एकूण सहा इंडिकेटर चे काम पूर्णत्वास नेण्यासाठी सदरचे संपूर्णतः अभियान सुरू करण्यात आलेले आहे .या अभियानांतर्गत तालुक्यातील गरोदर महिला नोंदणी ,बीपी ,हायपर टेन्शन, मधुमेह यांची तपासणी ,गरोदर महिलांना सकस आहार देणे विषयी जागृती, महिला बचत गटांना खेळते भांडवल उपलब्ध करून देणे आणि कृषी विभाग अंतर्गत जास्तीत जास्त शेतकऱ्यांचे जमिनीचे मृदा तपासणी करून हेल्थ कार्ड तयार करणे हा प्रमुख उद्देश आहे.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभात फेरीने करण्यात आली. या प्रभात फेरीमध्ये मंगरूळे हायस्कूलचे बँड पथक व एनसीसी विद्यार्थी,सरपंच, ग्रामसेवक, आशा ,अंगणवाडी सेविका, सीआरपी ,पंचायत समिति कर्मचारी, कृषी सहाय्यक यांनी सहभाग घेतला होता. सदरच्या कार्यक्रमाची सुरुवात प्रतिज्ञा घेऊन करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी श्री शंकर कवितके यांनी केले. सहा इंडिकेटर बाबत माहिती तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे ,अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीमती शुभदा जेऊरकर , वैद्यकीय अधिकारी श्रीमती सुरेखा बिराजदार यांनी दिली. तसेच सदरच्या कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या सर्वांना नीती आयोगाच्या प्रतिनिधी श्रीमती सायली माणकिकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमांमध्ये गरोदर महिलांच्या पोषण विषयक जागृतीसाठी पथनाट्याचे सादरीकरण महिला कर्मचारी यांच्याकडून करण्यात आले . तसेच सदर उद्घाटनप्रसंगी सहा इंडिकेटर ची माहिती देण्यासाठी सहा स्टॉलची उभारणी करण्यात आलेली होती व आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते त्याचे उद्घाटन नीती आयोगाच्या प्रतिनिधी यांच्या हस्ते करण्यात आले .याप्रसंगी तालुकास्तरीय सर्व विभाग प्रमुख ,तालुक्याच्या फेलो श्रीमती प्रीती रोकडे ,तसेच सांगोला तालुक्याच्या फेलो श्रीमती अनुजा गावडे ,तसेच श्रीमती निकिता गायकवाड उपस्थित होत्या .सूत्रसंचालन विस्तार अधिकारी संजय पाटील यांनी केले व कक्ष अधिकारी दयानंद परिचारक, रेवणसिद्ध बोरगाव, यासह सर्व कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले आभार कृषी अधिकारी सचिन चव्हाण यावेळीयांनी मानले शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांसाठी राज्यांतर्गत पीक स्पर्धेचे आयोजन

## जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पीक स्पर्धेत सहभागी व्हावे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः कृषी विभागामार्फत खरीप हंगाम सन २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग, सुर्यफुल या ११ पिकांसाठी पिकस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. खरीप हंगाम २०२४ साठी अर्ज करण्याची अंतिम तारीख मूग व उडीद पिकांसाठी ३१ जुलै २०२४ व उर्वरित पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२४ असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या पीक स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

पिकस्पर्धेची ठळक वैशिष्टे व बाबी : * पीकस्पर्धेसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख मूग व उडीद पिकासाठी ३१ जुलै तसेच भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमुग व सुर्यफुल या पिकांसाठी ३१ ऑगस्ट आहे. * स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र सर्वसाधारण गटासाठी रक्कम रु.३०० व आदिवासी गटासाठी रक्कम रु. १५० राहिल. * स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणा-या शेतक-याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. * पिकस्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरता स्पर्धकास स्वतःच्या शेतावर रपर्धेकरिता सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या पिकाची भात पिकाच्या बाबत्तीत किमान २० आर व इतर पिकांच्या बाबतीत किमान ४० आर (१ एकर) क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. * पिकस्पर्धा तालुकास्तरावर आयोजित करण्यात येणार असून सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुकास्तरावरील पिकस्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतक-यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे.

.विहीत नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन. , ७/१२, ८-अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास), पिकस्पर्धासाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा, बँक खाते चेक/ पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.इ.पिकस्पर्धा बक्षिसाचे स्वरूप- सर्वसाधारण व आदिवासी गटातील शेतकऱ्यांसाठी राज्य, जिल्हा व तालुका पातळीवरील पीकनिहाय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची बषीस रक्कम तालुका पातळीवर पहिल्या क्रमांसाठी ५ हजार, द्वितीय क्रमांक ३ हजार, तिसरा क्रमांक २ हजार, जिल्हा पातळी प्रथम क्रमांक १० हजार, द्वितीय क्रमांक ७ हजार, तृतीय क्रमांक ५ हजार, राज्य पातळी प्रथम क्रमांक ५० हजार, द्वितीय क्रमांक ४० हजार, तृतीय क्रमांक ३० हजार अशा प्रकारे पिकस्पर्धा बक्षिसाचे स्वरूप ठेवण्यात आले असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री गावसाने यांनी कळविले आहे.

राज्यामध्ये पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतक-यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतक-यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून आणखी उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतक-यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यातर्गत पिकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

# सुविधा कर्ज व महिला समृद्धी योजनेसाठी भरलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रत जिल्हा कार्यालयात देण्याचे आवाहन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मार्फत मांग, मातंग, मिनी-मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा या जातीतील समाज बांधवांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. सन २०२३-२४ या वित्तीय वर्षासाठी राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय विकास महामंडळ दिल्ली (एनएसएफडीसी, दिल्ली) व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मार्फत सुविधा कर्ज योजना-रु.५.००लाख व, महिला समृध्दी योजना रु.१.४० लाख हया योजना सुरु करण्यात आल्या आहेत. या योजनांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने दिनांक २२ मार्च २०२४ रोजीपर्यंत भरणा करण्यास मुदत देण्यात आली होती.

तसेच ऑनलाईन भरणा केलेल्या अर्जाची व त्यासोबत जमा केलेल्या कागदपत्रांची झेरॉक्स प्रत ०३ प्रतीत महामंडळाच्या जिल्हा कार्यालयास जमा करणे आवश्यक आहे. ज्या अर्जदारांनी सुविधा कर्ज योजना रक्कम रु.५.०० लाख व महिला समृध्दी योजना रक्कम रु.१.४० लाख या योजनांमध्ये कर्ज मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केलेले आहेत, अशा अर्जदारांनी ऑनलाईन भरणा केलेल्या अर्जाची व त्यासोबत जमा केलेल्या कागदपत्रांची प्रत एकूण ०३ झेरॉक्स प्रतीत स्वयं साक्षांकित करुन दिनांक १८ जुलै २०२४ रोजी पर्यंत महामंडळाच्या जिल्हा कार्यालयास जमा करण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक आर. एच. चव्हाण यांनी केले आहे.

## श्रींच्या गाभाऱ्यातील मेघडंबरीचे काम पूर्ण

# लाकडी मेघडंबरीस नांदेड येथील दानशुर भाविकाकडून २ कोटी ४५ लाखाची चांदी अर्पण





**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धन करण्याचे काम पुरातत्व विभागामार्फत सुरू आहे. त्यामध्ये श्री.विठ्ठल गाभारा व श्री.रूक्मिणी गाभारा येथील संवर्धनाचे काम प्राधान्याने पूर्ण करण्यात आले आहे. यामध्ये श्री विठ्ठल गाभारा येथील लाकडी मेघडंबरी चांदीने मडवून बसविण्यात आली असून, रुक्मिणी मातेच्या गाभाऱ्यात बसवण्याचे काम सुरू आहे. या मेघडंबरीस नांदेड येथील दानशुर भाविक श्री सुमित गणपतराव मोरगे, नांदेड यांनी २ कोटी ४५ लाखाची चांदी अर्पण केली असल्याची माहिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. सदरच्या दोन्ही मेघडंबरी मंदिर समितीस प्राप्त झाल्या असून, मेघडंबरीचे पुजन मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते करून श्री विठ्ठल गाभा-यात बसविण्यात आली आहे

व श्री रुक्मिणी गाभाऱ्यात बसवण्याचे काम सुरू आहे. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, सल्लागार परिषद सदस्य अनिल अत्रे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, ह.भ.प. विष्णु महाराज कबीर, विभाग प्रमुख संजय कोकीळ, ज्ञानेश्रवर कुलकर्णी, अतुल बक्षी, देणगीदार सुमित मोरगे व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

श्री संत कबीर महाराज मठ व फडाकडून मंदिर समितीस दोन लाकडी मेघडंबरी सेवाभावी तत्वावर मोफत मिळाल्या होत्या.

या दोन्ही मेघडंबरीस सुमारे २ कोटी ४५ लाखाची चांदी नांदेड येथील दानशुर भाविक सुमित मोरगे यांनी बसवून दिली आहे. त्यासाठी श्री विठ्ठल गाभा-यातील मेघडंबरीला सुमारे १३५ किलो (रू १ कोटी ४६ लाख) व श्री रूक्मिणीमातेच्या गाभा-यातील मेघडंबरीला सुमारे ९० किलो (रू ९९ लाख ७३ हजार) चांदीचा वापर करण्यात आला असून, मेघडंबरीला चांदीपासून सुबक नक्षीकाम करण्यात आले आहे. सदर चांदीचा पत्रा १६ ते २६ गेजचा असून, सदरचे काम मे. जांगिड सिल्वर वर्क्स, पुणे यांनी केले आहे.

त्यासाठी १३ कारागीरांनी २५ दिवसांत काम पूर्ण केले आहे. याशिवाय, सदरच्या दोन्ही लाकडी मेघडंबरी तेजस फर्निचर पंढरपूर येथील अमोल सुतार, बाळू सुतार, पांडूरंग लोंढे या कारागीराने तयार केल्या होत्या. त्यासाठी देवरूख जि. रत्नागिरी येथील ३ ते ४ वर्षापूर्वीच्या सागवानी लाकडाचा वापर केला असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

# आषाढी वारीच्यानिमित्ताने मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

## कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती.

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढ शुध्द एकादशीला म्हणजे दिनांक १७ जुलै रोजी आषाढी यात्रा संपन्न होत आहे. या दिवशी मुख्यमंत्री महोदय




व मानाचे वारकरी यांच्या शुभहस्ते सपत्नीक श्रींची शासकीय महापूजा आयोजित करण्यात आली आहे. या यात्रेला मोठ्या प्रमाणात वारकरी भाविकांची गर्दी असते. सदर यात्रा शांततेत व नियोजनबध्द पध्दतीने पार पाडणेकामी आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

आषाढी यात्रा २०२४ निमित्त मोनिका सिंह-ठाकूर, अप्पर जिल्हाधिकारी तथा इन्सिडेंट कमांडर यांनी दिलेल्या सूचनेनुसार अग्निशमन, प्रथमोपचार, causality carrying method व safe evacuation बाबत दि. २ व ५ जुलै रोजी श्री संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.दि. ०५ जुलैच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्राचे दिपप्रज्वलन मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. त्यामध्ये संभाजी कारले यांनी अग्निशमन, डॉ. अनिल काळे यांनी प्रथमोपचार तसेच बीमल नथवाणी, हनुमान चौधरी, किशोर आढळकर यांनी causality carrying method व safe evacuation बाबत प्रशिक्षण दिले. सदरचे प्रशिक्षण हे यात्रा कालावधीच्या दृष्टीने खुप उपयोगी होणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमास मंदिर समितीकडील सुमारे ३०० कर्मचारी / स्वयंसेवक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विभाग प्रमुख विनोद पाटील यांनी केले व कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी विभाग प्रमुख राजेश पिटले, सहायक विभाग प्रमुख राजकुमार कुलकर्णी, दादा नलवडे, भाऊसाहेब घोरपडे यांनी परिश्रम घेतले.

# भिवंडी मनपा कर्मचारी अविनाश दोंदे सेवानिवृत्त




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

ठाणे/मिलींद जाधव : भिवंडी मनपाचे कर्मचारी अविनाश दोंदे नुकतेच सेवानिवृत्त झाले. यावेळी समता संघर्ष संघटन यांच्या वतीने सेवापूर्तीचा कार्यक्रम घेण्यात आला असून समता संघर्ष संघटनच्या वतीने व लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने अविनाश दोंदे यांना सपत्नीक सन्मानित करण्यात आले असून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या . सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश सावंत होते. दोंदे हे भिवंडी मनपात १९८४ रोजी रुजू झाले होते तब्बल. ४० वर्ष त्यांनी महापालिकेत सेवा केली आहे. कोरोना काळातही दोंदे यांनी जीवाची पर्वा न करता आपले कर्तव्य बजावले होते. अविनाश दोंदे फुले, शाहू आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. बामसेम , समता संघर्ष संघटन, अंधश्रद्धा निर्मूलन अशा विविध संघटनामध्ये त्यानी काम केले आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून त्यांनी जनजागृतीची कामे केली आहेत. ते सामाजिक कार्यकर्ते असून विविध उपक्रमात त्यांची नेहमीच हजेरी असते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश सावंत यांनी अविनाश दोंदे यांना शुभेच्छा देऊन आंबेडकरी चळवळ बाबत आपले मनोगत व्यक्त केले.तर

समता संघर्ष संघटनचे अध्यक्ष शैलेश दोंदे, उपाध्यक्ष सदानंद गायकवाड, संघटक गणेश सोष्टे, अँड. श्रीकांत कांबळे,रविंद्र गायकवाड डॉ. सुषमा बसवंत , भारतीय बौद्ध महासभा भिवंडी तालुका अध्यक्ष रोहित जाधव ,

कवी मिलिंद जाधव, संघरत्न घनघाव, अक्षय भोईर, सुरेखा पैठणे,राजेश देवरुककर, सागर भोईर, डॉ. सुशांत तांबे, स्नेहल तांबे, अशोक भोये अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे पदाधिकारी तर आदींनी सेवानिवृत्तीपर शुभेच्छा दिल्या. तर सेवानिवृत्त अविनाश दोंदे यांनी आपल्या मनोगतात जीवन प्रवास सांगितला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेखा पैठेणे यांनी केले.

# इनरव्हील क्लब टेंभुर्णीचा पद्ग्रहण सोहळा संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

टेंभुर्णी/प्रतिनिधीः इनरव्हील क्लब टेभुर्णीच्या २०२४-२५ यावर्षासाठी अध्यक्ष स्वराली बोबडे सचिवपदी वैष्णवी कुलकर्णी खजिनदार संगिता सपाटे, उपाध्यक्ष स्वाती गांधी, आएसओ मनिषा जांभळे, एडिटर अस्लेषा येवले, सीसी गितांजली डिंगरे, व सीएलसीसी स्मिता गांधी यांनी पदभार स्विकारला.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सहारा इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन अकलूजच्या डॉ.श्रध्दा जवंजाळ यांनी मानसिक व शारीरीक तानतनाव, कॅन्सर लसीकरणकरण या विषयावर उपस्थित महीलांना मार्गदर्शन केले. तसेच सरपंच सुरजा बोबडे यांनी झाडे लावण्यास,स्वच्छता व शासकीय योजना याविषयी माहीती दिली. क्लबच्या मावळत्या अध्यक्षा ज्योती कोठरी यांनी गतवर्षीचे कार्य थोडक्यात सांगितले. नूतन अध्यक्षा स्वराली बोबडे यांनी इनरव्हील डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ.शोभना पालेकर व असोसिएशन प्रेसिडेन्ट सुनिता जैन यांनी क्लबच्या कार्यासाठी सांगितलेले मार्गदर्शन व करावयाचे कार्य थोडक्यात सांगितले. इनरव्हील ब्रॅन्डीग व प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळा हा संदेश देण्यासाठी कापडी पिशव्यांचे वाटप केले. १० वीं १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. क्लब सदस्या डॉ. मिनाक्षी गायकवाड, डॉ. स्मिता भोसले ,डॉ.ज्योती अनंतकवळस,डॉ.कोमल सपाटे यांचा डॉक्टर्स डे निमित्त झाडे देऊन सन्मान करण्यात आला.नवीन सदस्या स्वरुपा बोबडे व शर्वरी बोत्रे यांना पिनअप करुन सन्मान केला. कार्यक्रमास उपस्थित अनुराधा काकी बोबडे,प्रिया कानडे,राणी अटकळे,कल्पना गांधी,मंगल कल्याणी,जयश्री येवले,तनुजा शहा,सुनिता अनंतकवळस,हेमा चौधरी,सुप्रिया जोशी,भारती पाटील,प्रज्ञा अरगडे,मिताली शहा,वैशाली शिंदे,अंकिता चंकेश्र्वरा,सुरेखा ननवरे,रुपाली येवले,संजीवनी दोशी,भामा ढगे,रेणुका भणगे,साधना फुटाणे,स्वाती ताबे,सविता रावळ,रेणुका गांधी हे सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन वेदांन्ती कुलकर्णी व अनुष्का भणगे यांनी केले.

# सामाजिक बांधिलकीजपत वाढदिवस साजरा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

भिवंडी/मिलींद जाधव : सामाजिक कार्यकर्त्या,वनश्री सामाजिक संस्था शहापूर उपाध्यक्ष,भारतीय बौद्ध महासभा भिवंडी सचिव,मानवाधिकार संघटन भिवंडी सचिव विद्या प्रकाश सोनावणेयांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मानवाधिकार आणि अर्टीआई संघटन भारत महाराष्ट्र यांच्या मार्फत पंचशील नगर पडघे येथे वृक्षारोपण करुन पर्यावरणाचा सामाजिक संदेश देत वाढदिवस साजरा करण्यात आला.



त्याचप्रमाणे सामाजिक बांधिलकी जपत जिल्हा परिषद शाळा आदिवासी पाडा बोरीवली शाळेत मुलांसोबत वाढदिवस साजरा करून मुलांना खाऊ,शालेय साहित्य तसेच झाडांचे महत्त्व सांगून वृक्षाचे वाटप करण्यात आले.या प्रसंगी पडघा ग्रामपंचायत सरपंच प्रभावती जाधव ,मानवाधिकार संगठन जिल्हा अध्यक्ष रमेश जाधव, सचिव चंद्रकांत कांबळे,मानवाधिकार संघटना भिवंडी अध्यक्ष .शरद जाधव ,उपाध्यक्ष देवेंद्र देशमुख,वनश्री सामाजिक संस्था जिल्हा अध्यक्ष पत्रकार किरणकुमार थोरात,सचिव लक्ष्मी मुरगण,जिल्हा परिषद शाळा आदिवासी पाडा बोरीवली शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश सोनावणे त्याचप्रमाणे पौर्णिमा महिला बचत गटाच्या सदस्या,भरारी लोकसंचालित च्या सदस्या व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# स्वेरीत प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. स्नेहा रोंगे यांचे विशेष मार्गदर्शन सत्र संपन्न







**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः डॉ.बी.पी. रोंगे हॉस्पिटल, पंढरपूर व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर (ऑटोनॉमस) यांच्या संयुक्त विद्यमाने स्वेरी अंतर्गत असणाऱ्या सर्व महाविद्यालयांतील शिक्षिका, महिला शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनींसाठी प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.स्नेहा सुरज रोंगे यांच्या 'सर्वावॉक (लर्शीीर्रिल) कॅन्सर वैक्सीन' या विषयावरील मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले होते.

पुण्याच्या प्रसिद्ध दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल आणि शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागात वैद्यकीय अनुभव घेत असताना रुग्णांना उच्च दर्जाची आरोग्यसेवा देण्याच्या हेतूने डॉ.स्नेहा रोंगे यांनी पंढरपूर शहरात 'डॉ. बी.पी. रोंगे हॉस्पिटल' सुरु केले असून त्या विशेष स्त्रीरोग तज्ञ आहेत. महिलांच्या उपचारासाठी हा दवाखाना रुग्णसेवेसाठी मागील चार वर्षांपासून सज्ज झाला आहे. डॉ.स्नेहा रोंगे या स्वतः एम.बी.बी.एस., एम.एस. (ओबीजीवाय) असून त्यांनी पुणे येथे शिक्षण घेतले आहे. बुधवार, दि. २६ जून,२०२४ रोजी स्वेरीच्या वातानुकुलीत इंटरनॅशनल कॉन्फरन्स हॉलमध्ये महिलांच्या गर्भाशयाच्या आजारासंदर्भात या विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले होते. या सत्रात त्यांनी 'सर्वावॉक' लसीवर माहिती दिली. 'सर्वावॉक (cervavac) ही एक लस आहे जी ह्युमन पॅपिलोमाव्हायरस (एचपीव्ही) मुळे होणा-या रोगांपासून संरक्षण करू शकते. जननेंद्रियाच्या वार्त्स- ग्रीवा, व्हल्व्हर तसेच स्त्रियांना इतर आजार असतात. स्त्रियांच्या अशा आणि इतर अनेक आजारावर डॉ. स्नेहा रोंगे यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. पुढे बोलताना त्यांनी 'गर्भाशयाचा कॅन्सर' म्हणजे काय? तो कधी होतो, हे सांगून यासाठी वयाच्या १५ ते २६ वर्षात मुली अथवा महिला ही लस घेऊ शकतात असे सांगितले. पुढे त्यांनी गर्भपिशवीचा कॅन्सर कशामुळे होतो याबाबत माहिती दिली. या कॅन्सरमुळे जवळपास ७७ हजार रुग्ण दरवर्षी मृत्यू पावतात असे सांगून ही लस कोणी घ्यायची याविषयी माहिती देवून लसीकरणाचे महत्त्व पटवून सांगितले तसेच या वैक्सीनच्या विविध प्रकारांबाबत माहिती सांगितली. 'सर्वावॉक (cervavac) वैक्सीन हे मार्केटमध्ये सहजरीत्या उपलब्ध होत आहे असे सांगून सर्व मुली/महिलांनी त्यांच्या आजूबाजूला या लसीबद्दल जनजागृती करावी असे त्यांनी आवाहन केले. यावेळी अभियांत्रिकीच्या उपप्राचार्य व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी पवार, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. स्वाती पवार, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.दिप्ती तंबोळी आदी उपस्थित होते. डॉ. नीता कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले तर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (एफडीपी) च्या समन्वयिका प्रा.मिनल भोरे यांनी आभार मानले.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस भाविकाकडून ७७ हजार किंमतीचे चांदीचे टाळ अर्पण

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः हडपसर, पुणे येथील भाविक कमलेश अशोक मगर यांनी श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस १ किलो ०५५ ग्रॅम वजनाच्या चांदी वस्तू (टाळ) अर्पण केले आहेत. त्याची किंमत रू.७७६४८/- इतकी आहे. यावेळी मंदिर समितीच्या वतीने देणगीदार यांचा सत्कार मंदिर समितीचे विभाग प्रमुख संजय कोकीळ यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब, विभाग प्रमुख ज्ञानेश्र्वर कुलकर्णी उपस्थित होते.



